# अवघी मुंबई विलासरावांसाठी ढाळतेय अश्रू

अजित सावंत

“आमने सामने” या झी मराठी वरील कार्यक्रमामध्ये, “महाराष्ट्राच्या राजकारणावर व समाजकारणावर मराठी संस्कृतीचा ठसा उमटलेला दिसत असला पाहिजे” ही भूमिका मांडणे यांत गैर काय? असा उलट सवाल मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केला व उपस्थित प्रेक्षकांनी विलासरावांना उत्स्फूर्त दाद दिली. “अलिकडे आपण शिवसेनेची भाषा बोलत आहात” असा आरोप आपल्यावर होत आहे असं म्हटल्यावर मुख्यमंत्री विलासराव देशमुखांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आपण परप्रांतियांच्या विरोधामध्ये नाही व घटनेने या देशातील नागरिकांना देशामध्ये कुठेही जाऊन धंदा–व्यवसाय करण्याचा व रोजगार मिळविण्याचा हक्क दिलेला आहे हे मान्य करून मुख्यमंत्री म्हणाले – “परंतु मुंबईची आता लोंढ्याना सामावून घेण्याची क्षमता संपलेली आहे हे जाहीरपणे सांगण्याची वेळ आलेली आहे.” विलासरावांनी, “राज्यकर्त्यांनी मुंबईच्या विकासाकडे आवश्यक तितकं लक्ष दिलेलं नाही” हे कबूल करण्याचा प्रामाणिकपणाही दाखविला. आज विलासरावांच दु:खद् निधन झाले. महाराष्ट्र व मुंबई शोकसागरात बुडली आहे. मुंबईकरांच्या विलासरावांना श्रध्दांजली अर्पण करताना, त्यांनी महाराष्ट्राच्या व मुंबईच्या बाबतीमध्ये केलेल्या या विधानांमधून व्यक्त झालेली, मराठी संस्कृती विषयीची कळकळ, मुंबईबद्दलची आत्मीयता आणि मुंबईच्या विकासाबाबतची प्रामाणिक तळमळ या साऱ्याचे स्मरण होते.

१९९९ साली विलासरावांची मुख्यमंत्रीपदाची पहिली कारकीर्द सुरू झाली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होण्याचं त्यांचं दीर्घकाळ जपलेलं स्वप्न साकार झालं तरी अस्थिरतेचं संकट आ वासून समोर उभं होतं. त्याही स्थितीमध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय, धोरणं आणि भूमिका यांतून मुख्यमंत्री विलासरावांच्या दूरदृष्टीचं, प्रशासन कौशल्याचं, तर पक्षाबाहेर व आंतही संयत भूमिका घेणाऱ्या राजकीय चातुर्यांचं दर्शन घडत गेलं. मुंबईपुरतंच बोलायचं झालं तर, मुंबईतल्या गिरणी कामगारांची कायदेशीर देणी त्यांना हक्काने मिळावी यासाठी देशातलं पहिलं आदर्श वस्त्रोद्योग धोरण आखण्याची दूरदृष्टी विलासरावांनी दाखविली. याच धोरणामध्ये गिरण्यांच्या चाळीमध्ये रहाणाऱ्या रहिवाशांना बेघर करता येणार नाही याची दक्षता घेऊन विलासरावांनी कामगारांना दिलासा दिला. रेल्वे रूळालगतच्या झोपड्या हटविण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर केंद्रातील भाजपाप्रणित रालोआ सरकारच्या अधिपत्याखालील रेल्वे मंत्रालयाचे अधिकारी झोपड्या तोडण्यास सरसावले असता त्यांना

आवश्यक ते पोलीस बळ देण्यास असमर्थता दर्शवून विलासरावांनी अत्यंत चतुराईने झोपडीवासीयांवर कोसळलेल्या संकटावर मात केली व नंतर “स्पार्क” च्या सहाय्याने या झोपडीवासीयांचे २२५ चौ. फूटांच्या सदनिका देऊन त्यांच पुनर्वसन केलं. मुंबईमध्ये नव्हे तर देशामध्ये हे पहिल्यांदा घडलं. ज्याची झोपडी तोडली गेली तो झोपडीवासी सात मजल्यांच्या लिफ्ट असलेल्या इमारतीमध्ये सन्मानाने रहावयास गेला. १२ लाख झोपडीवासीयांना संरक्षण देण्याकरिता फोटोपास देण्याचा निर्णय असो वा १४ फूट उंची वाढविण्यास परवानगी देणे असो, झोपडीवासीयांच्या हितासाठी विलासराव दक्ष असल्याचा प्रत्यय आला. मुंबईच्या विकासाबाबत केंद्राचीही जबाबदारी आहे हे सर्व राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये ठणकावून सांगणारी भूमिका मांडून मुंबईसाठी केंद्राने सालीना किमान रु. १३०० कोटी द्यावयास हवेत असं विलासरावांनी बजावलं. आज मुंबईच्या विकासाबाबत केंद्रानेही आपला वाटा उचलून आर्थिक मदतीचा ओघ मुंबईकडे वळवला आहे. मुंबईत रहाणाऱ्या प्रत्येकाच जीवन सुखकर व सुरक्षित बनविण्याच्या प्रयत्नांना विलासरावांनी चालना दिली हे निश्चित. मुख्यमंत्री विलासराव देशमुखांनी घेतलेल्या निर्णयांमुळे आज प्रचंड वेगाने मुंबई महानगराचे स्वरूप पालटताना दिसत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (MMRDA) असलेल्या केवळ नियोजनाच्या अधिकाराबरोबरच, विकास योजना राबविण्याचा अधिकार देणे व मुंबईतील विशेषत: उपनगरातील वाहतुकीचे स्वरूप पालटविणारी महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी मुंबई नागरी मुलभूत सुविधा प्रकल्प सुरू करणे हे विलासरावांच्या कारकीर्दीमधे झालेले दोन महत्वपूर्ण निर्णय मुंबईच्या विकासासंबंधी दूरदर्शीपणा दाखविणारे निर्णय आहेत यांत शंका नाही.

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईचं झपाट्याने होत असलेले बकालीकरण हा साऱ्यांच्याच चिंतेचा व चर्चेचा विषय आहे तरी “राज्यकर्त्यांनी मुंबईच्या विकासाबाबत दुर्लक्ष केलं “हे कबूल करण्याची हिंमत मुख्यमंत्री म्हणून केवळ विलासरावांनीच दाखविली.

आज मुंबईसमोर अनेक प्रश्न व समस्या आहेत. १९००० जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळींमधून रहाणाऱ्या भाडेकरूंचे प्रश्न, बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास, बी.आय.टी. चाळी व महापालिकेच्या मालमत्तांमधून रहाणाऱ्या नागरिकांच्या समस्या, मालमत्ता कराच्या पुनर्रचनेमध्ये कामगार व मध्यमवर्गिय यांच्यासमोरील संभाव्य भाडेवाढीचा धोका व उपनगरवासीयांवरील आर्थिक बोजा कमी करण्याची गरज, २००० पर्यंतच्या झोपडीवासीयांचे पुनर्वसन, विकासासाठी आवश्यक आरक्षित भूखंड अतिक्रमण मुक्त करणे, गिरण्यांच्या जमिनीच्या विकासातून निर्माण झालेले प्रश्न, पुनर्विकासानंतर जुन्या चाळीतून भाडेकरूंना मालमत्ता करामध्ये द्यावयाची सवलत, मिठागरांच्या जमिनीवर आखावयाच्या पुनर्विकास

योजना, वाढती बेरोजगारी, कायदा व सुव्यवस्थेसंबंधित प्रश्न, अशा अनेक जटिल समस्या व प्रश्न  समोर आहेत. नेमक्या या वेळी मुंबईवासीयांना विलासरावांच्या निधनामुळे हतबल झाल्यासारखे वाटेल.

महाराष्ट्रासमोरच्या वीज टंचाई व पाणी या दोन मोठ्या संकटांचा सामना विलासराव करीत होते. परंतु कुणावरही दोषारोप न करता, महाराष्ट्रावर येऊ घातलेल्या वीज टंचाईच्या संकटाची पाऊले आम्ही वेळीच ओळखू शकलो नाही, हे कबूल करण्याचे धारिष्ट्य विलासरावांनी दाखवले तेंव्हा एका राजकीय नेत्याचा उमदेपणा ठळकपणे दिसून आला. पाणी टंचाईच्या भीषण संकटाचा सामना आपल्या लातूर मतदार संघातील जनतेलाही करावा लागत आहे हे मान्य करताना, एक मुख्यमंत्री नव्हे तर आपल्या मतदारांना जबाबदार असलेला हा नेता आपले दुःख दडवू शकला नाही. विलासराव गंभीरतेने प्रश्नांकडे पहात नाहीत, त्यांचा दृष्टिकोन नेहमीच उडवाउडवीचा असतो असे आरोप त्यांचे टीकाकार करीत. मुख्यमंत्र्यांनी नेहमी चेहरा चौकोनी ठेवावा व त्यावर नेहमीच चिंतेच्या छटा दिसाव्या अशीच जणू या टीकाकारांची अपेक्षा असते. विलासरावांच्या स्वभावातला मोकळेपणा, चेहऱ्यावरील हास्य या साऱ्यांपाठी, एक कणखर, निर्धारी व्यक्तीमत्व दडलेलं असतं याकडे हे टीकाकार जरी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होते तरी विलासरावांच्या निरनिराळया निर्णयांमधून, भूमिकांमधून मात्र हे वेगळेपण समोर येत राहील आणि जनतेनेही विलासरावांवर सदैव वाढता विश्वास ठेवला.

महाराष्ट्रावरचा मराठी संस्कृतीचा प्रभाव कमी होत चालला की काय? अशी कुजबूज राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये नेहमीच चाललेली असते. परंतु मराठी मनाच्या या घुसमटीला वाचा फोडण्याचं धैर्य केवळ आपणच दाखवू शकतो हे विलासरावांनी सिध्द केलं. मंत्रालयामध्ये मराठी पाटया फार कमी दिसतात हे म्हणणाऱ्या मुख्यमंत्री विलासराव देशमुखांनी इतर प्रांतीयांच्याबद्दल द्वेष व्यक्त केला नाही तर मराठी तरूणांनी प्रशासकीय सेवांकडे मोठया प्रमाणामध्ये वळावयास हवं ही भावना राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यक्त केली. आपली भाषा शिवसेनेची भाषा नसून त्यामागे अन्य प्रांतीयांचा द्वेष नव्हे तर मराठी संस्कृतीचा अभिमान आहे हे सांगण्यासही विलासराव विसरले नाही. हे राज्य मराठी आहे आणि राज्यावर मराठी संस्कृतीचा ठसाच जाणवला पाहिजे हे आपलं मत त्यांनी ठामपणे मांडले. आज राज्याला अशा भूमिकांवर ठाम रहाणाऱ्या कणखर नेतृत्वाची गरज आहे. अनेक मुख्यमंत्री झाले परंतु राज्याचं नेतृत्व करताना “घार हिंडते आकाशी लक्ष तिचे आपल्या मतदार संघापाशी” अशी गत झाली. त्यांत गैर काही नसलं तरी विकासाची गाडी सांगली, सातारा, बारामतीच्या पुढे जाताना मात्र धीम्या गतीने चालत राहिली. मुंबईमध्ये वीस, वीस, पंचवीस वर्षे रहाणाऱ्या

अनेक मुख्यमंत्र्यांना, वर्षा ते मंत्रालय आणि एअरपोर्ट पर्यंतची मुंबई दिसली परंतु त्या पलिकडच्या गिरणगांवातून वसलेली, चाळींमधल्या खुराडेवजा खोल्यांतून रहाणारी, टेकडयांच्या पायथ्यापासून माथ्यापर्यंत वसलेल्या, पाईपलाईनवर स्थिरावलेल्या, आणि धारावीमध्ये एकमेकांना खेटून उभ्या राहिलेल्या झोपडयांतली मुंबई मात्र दिसली नाही. लातूरचा कायापालट करणारे, मांजरा सहकारी साखर कारखान्याला आशियातील आदर्श साखर कारखाना असा लौकिक प्राप्त करून देणारे, अनेक शिक्षण संस्था, सामाजिक संस्था, पत्र सृष्टीशी आपलं नातं निर्माण करणारे विलासराव देशमुख मात्र खऱ्या अर्थाने मुंबईत रूळले. एव्हढंच नव्हे तर आपल्या मुलाला बॉलीवुडमध्ये स्थिरावण्यास प्रोत्साहन देणारे विलासराव मुंबईच्या साहित्यिक वर्तुळामध्ये व सांस्कृतिक क्षेत्रामधे देखिल, प्रसंगी मुख्यमंत्रीपदाची वस्त्रे बाजूला ठेवून, आपले रसिक मित्र उल्हासदादा पवारांच्या संगतीने रमले. म्हणूनच मुंबईने जे दिलं त्याची परतफेड करण्याचं विलासरावांच्या मनात असे. विलासरावांच्या मनातल्या या आंतरिक इच्छेचं, तळमळीचं प्रतिबिंब, मुंबईबाबतच्या त्यांच्या वक्तव्यामधून आणि कृतीतून देखिल पडलेलं जाणवत असे. मुंबईच्या विकासाचा ध्यास घेताना, इथला कामगार, झोपडीवासी, भाडेकरू यांच्यासाठीच हा विकास असेल व सामान्य माणूस या विकासाचा केंद्रबिंदू राहील याची हमी मुंबईकरांना देण्यामध्ये मुख्यमंत्री विलासराव यशस्वी ठरले ते यामुळेच.

विलासराव देशमुखांच्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कारकीर्दीची अखेर अनपेक्षितपणे झाली. परंतु पक्षश्रेष्ठींचा निर्णय शिरसावंद्य मानून त्यांनी सत्तेची सूत्रे आपल्या जिवलग मित्राच्या हाती सुशीलकुमार शिंदेच्या हाती सोपवली. कुठे ही कुरकुर न करता, त्रागा न करता पक्ष श्रेष्ठींनी सोपविलेल्या जबाबदाऱ्या कोणताही गाजावाजा न करता विलासराव पार पाडीत राहिले. पक्षांतर्गत विरोधकांनी कोंडी केल्यामुळे राजकीय अज्ञातवासात जाण्याचे संकट १९९५ साली उभे राहिले असता, त्या संकटाचा धैर्याने सामना करण्याचा अनुभव विलासरावांच्या पाठीशी होताच. म्हणून मुख्यमंत्रीपद सोडावे लागताच, “लहरोंसे डर कर नौका पार नही होती” हे ध्यानांत घेऊन विलासरावांनी याही कठीण परिस्थितीचा उपयोग “नवी संधी” म्हणून केला. सत्तेवर असताना, आत्मपरीक्षण करण्यास, प्रश्नाचा अभ्यास करण्यास व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यास वेळ अपुरा पडत होता हे मनोमन मान्य करून विलासरावांनी याही संधीचे सोने केले. पक्षाला जेथे गरज असेल तेथे धावून जाऊन, कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेऊन व सर्व क्षेत्रांमध्ये वावर ठेवून, जनतेच्या एका मुख्यमंत्र्यांकडून काय अपेक्षा असू शकतात याची जाणीव विलासरावांना याच काळात झाली असावी. राज्य शकट हाकण्याची जबाबदारी पुन्हा एकदा खांद्यावर पडल्यावर विलासराव देशमुख हे “गढीवरचे देशमुख” न वाटता, सामान्यांचे नेते विलासराव वाटू लागले याचं हेच खरं कारण आहे.

मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना, मुंबईने काँग्रेस पक्षाला भरभरून दिलं आहे याची पूर्ण कल्पना होती. मुंबईतल्या कष्टकऱ्यांनी, झोपडीवासीयांनी व मध्यमवर्गियांनीही काँग्रेसनेवर मनापासून विश्वास व्यक्त केला आहे व लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने मिळविलेलं लक्षणीय यश हे त्याचंच फलित आहे हे विलासरावांनी जाणलं होत. लोकप्रतिनिधी, प्रशासन व मुंबईतल्या कार्यकर्त्यांची फौज सोबत घेऊन, मुंबईच्या विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी मुख्यमंत्री विलासराव देशमुख प्रयत्नांची पराकाष्ठा केली व मुंबईतील महाराष्ट्राचे बदललेले चित्र येणाऱ्या काळामध्ये पहावयास मिळेल असा विश्वास वाटतो. विलासरावांना श्रध्दांजली अर्पण करताना कविवर्य सुरेश भट यांच्या शब्दांमध्ये भावना व्यक्त करावयाचा मोह आवरत नाही कारण तेच तर होतं विलासरावांचं स्वप्न ..... विलासरावांचा निर्धारही तोच होता.

आम्हांवरी खिळले डोळे उद्याच्या पिढ्यांचे,

आज स्वप्न बघतो आम्ही उद्याच्या दिसांचे,

आज कुठे इतिहासाचा समजलो इशारा !

बदलून टाकू आपुला महाराष्ट्र सारा,

वर्षवू इथे घामाच्या अहोरात्र धारा,

**अजित सावंत**

सरचिटणीस व प्रवक्ता, मुंबई काँग्रेस(निलंबित)

**मो.: 98200 69046**

**E-mail: ajitsawant11@yahoo.com**

# कार्यकर्त्याचा आधार विलासराव

अजित सावंत

दिल्लीला, केंद्रीय मंत्री विलासरावजी देशमुख यांच्या घरी, सकाळी ८ वाजता पोहोचलो. सोबत महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचा पदाधिकारी असलेला 'जे.पी.' ही सोबत होता. बंगल्यावर उत्सवी वातावरण होते. विलासरावांचा सचिव असलेल्या दिपक तावरेंनी हसतमुख स्वागत केलं. आज साहेबांच्या बंगल्यावरच्या या कार्यालयाचा प्रथम दिवस. त्यांनी माहीती दिली. थोडयाच वेळामधे प्रफुल्लित चेहेऱ्याच्या विलासरावांच आगमन झालं. आंत, भेटीसाठी चिठ्ठी पाठवताच, विलासरावांनी आंत बोलावून घेतलं. कार्यालयाच्या पहिल्याच दिवशी पहिलेच अभ्यागत असणारे आम्ही, विलासरावांच्या महाराष्ट्रातून आलो होतो याचा विलासरावांना आनंद झालेला दिसत होता. तसं पाहयला गेलं तर विलासरावांकडे आमचं काम काय होतं याची त्यांना पूर्ण कल्पना होती किंबहुना मला एका कार्यकर्त्याला राजकीयदृष्टया मदतीचा हात देण्याचा पक्का निर्धार त्यांनी मनोमन केला होता. मुंबईतील, पक्षाच्याच एका नेत्याच्या कुटिल कट कारस्थानाचा मी बळी ठरलो होतो. २७ वर्षे पक्षाची इमाने इतबारे सेवा करणाऱ्या मला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हस्तक ठरवून माझी पक्षातून हकालपट्टी करण्याचा घाट घालण्यांत आला होता. माझ्यासाठी हे सारं वेदनादायक होतं. परंतु विलासरावांनी मदतीचा आश्वासक हात पाठीवर ठेवला आणि मन हलकं झालं. थोडयाच वेळामधे, विलासरावांनी, कॉंग्रेस पक्षाच्या शिस्तपालन समितीचे प्रमुख असलेल्या श्री.मोतीलाल व्होरांना फोन जोडून देण्याच्या सूचना दिल्या. "या कार्यकर्त्याला मी अनेक वर्षे ओळखतो व तो संघाशी संबंधित असणं शक्य नाही", विलासरावजींच्या स्वरातील ठामपणा मोतीलाल वोरांनाही जाणवला असावा. विलासरावांच्या शिफारशीवरुन मोतीलाल वोरांनी माझ्यावरची शिस्तपालन समितीने केलेली कारवाई लगेचच रद्द केली. विलासरावांनी, स्वत:बद्दल निर्माण केलेल्या विश्वासानेच मोतीलाल वोरांसारख्या शिस्तीबाबत कमालीचे आग्रही असणाऱ्या नेत्याला माझ्यावरील कारवाई मागे घेण्यास भाग पाडलं होतं. कार्यकर्त्याच्या पाठीशी उभं रहाण्याची वृत्ती विलासरावांच्या खंबीरपणांचं दर्शन मला घडलं होतं.

विलासरावांच्या या कार्यकर्त्याला साथ देण्याच्या वृत्तीचं मला पुन्हा एकदा दर्शन घडलं. विलासरावांनी माझ्या पाठीशी उभं राहून हाणून पाडलेला डाव पुन्हा एकदा रचण्यांत आला. स्पष्टीकरण देण्याची कोणतीही संधी न देता मला कॉंग्रेस पक्षातून तडकाफडकी निलंबित करण्यांत आलं. त्याच दरम्यान विलासरावांच्या गंभीर आजाराची चर्चा दबक्या सुरात राजकीय वर्तुळात सुरु झाली होती. विलासरावांना भेटावं, त्यांना आजारातून बरे होण्यासाठी शुभेच्छा द्याव्या हया भावनेनं विलासरावांची भेट मागितली. भेटीसाठी लगेचच वेळ मिळाली.

मनावर दगड ठेवूनच गेलो. विलासरावांनी आंत बोलावताच, दर्शन घडलं ते त्याच हसतमुख प्रफुल्लित चेहऱ्याच्या विलासरावांचं ! विलासरावांच्या चेहऱ्यावर आजाराचा लवलेश ही नव्हता. मुंबईच्या राजकारणावर विलासराव दिलखुलासपणे बोलत होते. मधूनच मिस्किल शेरेबाजी सुरु होती. आजाराबद्दलच्या बातम्या म्हणजे हितशत्रूंनी उठविलेल्या अफवाच समजून मी ही मनाने निश्चिंत झालो होता. तुम्ही बिल्कुल काळजी करु नका, आम्ही आहोत ना ! हे सारं चालायचंच विलासरावांनी आश्वासक दिलासा दिला. महाराष्ट्राच्या या एकमेव नेत्याच्या कार्यकर्त्याला आपलंसं करणारा उमदेपणा काळजावर कायमचा कोरला गेला.

विलासरावांच्या निधनाने, अमित व रितेश यांचं पितृ छत्र हरपलं पण महाराष्ट्राची जनताही पोरकी झाली. कार्यकर्ता म्हणून आम्हा कार्यकर्त्यांना आलेलं पोरकेपण म्हणजे काय ? याचा जिवंत अनुभव घेण्याचं दुर्दैव माझ्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांच्या नशिबी आलं हे मात्र खरं!

**अजित सावंत**

सरचिटणीस व प्रवक्ता, मुंबई काँग्रेस(निलंबित)

**मो.: 98200 69046**

**E-mail: ajitsawant11@yahoo.com**

# कार्यकर्ता पोरका झाला

**अजित सावंत**

कार्यकर्त्यांची ओळख ठेवूण, कार्यकर्त्यांच्या एस्एम्एस् ला उत्तर देणं, फोनला प्रतिसाद देणं या मुळे कार्यकर्ते विलासरावांवर निहायत खूष असत. युवक काँग्रेसच्या मेळाव्यांमधून भाषण करताना विलासराव कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी आवर्जून सांगत – 'मी युवक काँग्रेसचा कार्यकर्ता होतो आणि पुढे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो. येथे उपस्थित असलेल्या युवक काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याला पुढे मुख्यमंत्री होण्याची संधी आहे हे माझ्या स्वानुभवावरुन सांगतो'. विलासरावांच्या या वक्तव्यावर सभागृहामधे टाळयांचा पाऊस पडे. कार्यकर्त्यांला समजून घेण्याचं, त्याची व्यथा जाणून घेण्याचं एक वेगळं कसब विलासरावांकडे होतं म्हणूनच कार्यकर्त्यांना विलासराव आपलेसे वाटत.

एलफिस्टन रोड ते माहीम दरम्यान पश्चिम रेल्वेच्या लाईन लगत मोकळया जागेमधे सुमारे ४० वर्षापासून सुमारे ३०० च्या वर झोपडया वसल्या होत्या. १९७२ च्या भीषण दुष्काळामधे, जगण्यासाठी म्हणून ही कुटुंबे, मराठवाडयातून, कोकणातून मुंबईमधे आली होती. पुढे रेल्वेच्या कामावर रोजंदारी मजूर म्हणून काम करीत त्यांनी तिथेच झोपडया बांधून वस्ती केली. विलासराव दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतरच्या काळामधे बहुतेक २००६ साली रेल्वेने या मोकळया जमिनीवर विस्तार प्रकल्प हाती घेतला. एके दिवशी रेल्वे पोलीसांची फौज आणून, या झोपडया अत्यंत निर्दयपणे तोडण्यांत आल्या. ३० ते ४० वर्षे तेथे रहाणारे झोपडीवासी बेघर झाले. जायचे कुठे ? हा प्रश्न आ वासून उभा राहिला. थंडी, पाऊस, उन कशाकशाची म्हणून पर्वा न करता, तात्पुरता आडोसा करुन हे बेघर झोपडीवासी तेथेच रहात. अधीमधी रेल्वेचे पोलीस येत. अंदाधुंदपणे आडोसे उद्धवस्त करीत, भांडी कुंडी घेऊन जात. प्रसंगी झोपडीवासीयांवर आपला हात चालवीत.

१९९५ साली मतदार यादीत असणाऱ्याला मुंबईमधे घर दिले जाते तर ३०-४० वर्षांपासून मुंबईमधे रहाणाऱ्या आम्हा झोपडीवासीयांचे पुनर्वसन करा मगच आम्हाला येथून हलवा, ही गरीब झोपडीवासीयांची मागणी होती. अनेक स्तरांवर प्रश्न मांडला, लोकप्रतिनिधींचे दरवाजे ठोठावले परंतु कागदी घोडे नाचविण्यापलीकडे काही होत नव्हते. झोपडीवासीयांची मागणी न्याय्य होती. त्यांचा हक्क त्यांना मिळवून द्यायचा होता. सरतेशेवटी आम्ही कार्यकर्त्यांनी टोकाचे पाऊल उचलायचा निर्णय घेतला. रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधायचे म्हणजे आततायीपणे काही करणे हा शेवटचा उपाय होता तोच करण्याचे ठरले.

औरंगाबादसाठी विशेष रेल्वेगाडीचा उद्घाटन समारंभ छत्रपती शिवाजी टर्मिनसवर होणार होता. उद्घाटक म्हणून रेल्वे राज्यमंत्री नारणभाई राठवा व प्रमुख अतिथी या नात्याने मुख्यमंत्री विलासराव देशमुख उपस्थित रहाणार होते. बस्स ठरले. जुळवाजुळव सुरु झाली, सुमारे दीड दोनशे झोपडीवासीयांना घेऊन आम्ही समारंभ स्थळी पोहोचलो, पोलीसांच्या लक्षांत येणार नाही अशा पद्धतीने कार्यक्रमस्थळी मोक्याच्या जागा पटकावल्या. रेल्वे राज्यमंत्री नारणभाई राठवा भाषणास

उभे राहिले अन् पहिल्या रांगेत बसलेल्या मी उठून ‘सोनिया गांधी जिंदाबाद‘, ‘घरचा हक्क मिळालाच पाहिजे‘ अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. एकच गोंधळ माजला. मुख्यमंत्री विलासराव अचंबित होऊन हा गोंधळ पहात होते. रेल्वे पोलीसांनी आम्हा आंदोलकांवर लाठया चालविण्यास सुरुवात केली. मला तर पोलीसांनी लगेचच ताब्यात घेऊन बडविण्यास सुरुवात केली होती. सर्वांची उचलबांगडी करुन आम्हां आंदोलकांना रेल्वे स्थानकावरच रेल्वे पोलीस ठाण्यांत नेण्यांत आले. संतापलेले रेल्वे पोलीस अधिकारी आता आपली चांगलीच धुलाई करणार असा अंदाज मनाशी बांधत असतानाच एक उच्च पोलीस अधिकारी आले व त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांस बाजूस घेऊन काही सूचना दिल्या. बहुतेक गुन्हा नोंदवून अटक करण्याच्या सूचना दिल्या असाव्यात मी माझ्या सहकाऱ्यास म्हटले व पुढील परिणामांना तोंड देण्याची सिध्दता मनोमनी करु लागलो. एव्हढयातच संबंधित अधिकाऱ्यांनी तुम्ही चहा घेणार कां ? अशी विचारणा केली व आम्हाला आश्चर्याचा धक्का दिला. ‘या कार्यकर्त्यांची मागणी योग्य आहे. त्यांची व्यथा योग्य आहे. त्यांच्यावर गुन्हा नोंदवू नका अशा सूचना स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत‘ असे सांगून अधिकाऱ्यांने आम्हाला आणखी एक आश्चर्याचा धक्का दिला. पण पुढे तर अधिकच नवल घडले, पोलीसांच्या नजरेतून सुटल्याने कार्यक्रम स्थळीच बसून राहिलेले कार्यकर्ते व झोपडीवासी आले ते ‘विलासराव देशमुख झिंदाबाद‘ च्या घोषणा देतच ! विलासरावांनी आपल्यां भाषणामधे हया प्रश्नाचा उल्लेख केला होता. एव्हढयावरच ते थांबले नव्हते तर या गरीब झोपडीवासीयांचे रेल्वेने पुनर्वसन केले पाहीजे अशी आग्रही भूमिका मांडून, रेल्वेने पुनर्वसन योजना आखल्यास ५०% अर्थसहाय्य राज्य सरकार देईल अशी जाहीर घोषणाही त्यांनी केली होती. कार्यकर्त्यांची व्यथा विलासरावांनी नेमकी जाणली होती व आम्हां आततायी कार्यकर्त्यांना माफ केल होतं.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांमधे ही बातमी झळकली. रेल्वे लाईनलगतच्या झोपडयांमधे त्या दिवशी दिवाळी साजरी झाली. पुढे रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी कमी पडले. रेल्वे प्रशासनाने न्यायालयाच्या आदेशाची ढाल पुढे करुन, पुनर्वसन करण्यास टाळाटाळ केली. विलासरावांनी मुख्यमंत्री या नात्याने आपले कर्तव्य पार पाडले परंतु रेल्वे प्रशासनाने आडमुठी भूमिका घेतली व आज ही झोपडीवासी व त्यांचे संसार उन, वारा, पाऊस याचा सामना करीत उघडयावर पडले. मध्यंतरी दिल्लीमधे जाऊन विलासरावांना या प्रश्नांची व प्रसंगाची आठवण करुन दिली. त्यांनी रेल्वे मंत्र्यांकडे पाठ पुरावा करण्याचे मान्य ही केले. विलासराव गेले , जनहिताचे, गोरगरीब जनतेचे प्रश्न मांडणाऱ्या कार्यकर्त्यांची तळमळ, व्यथा आता जाणणार कोण ? कार्यकर्ते पोरके झाले म्हणजे नेमके काय झाले ? हे पोरकेपण नेमकं असतं काय ? विलासरावांच्या अकाली निधनाने पोरकेपणाचा अर्थ मात्र कळला, तो मात्र आता काळजात सतत खुपत राहील.

**(अजित सावंत)**

**मो.: 98200 69046**

**E-mail: ajitsawant11@yahoo.com**

# कधीही, कुठेही प्रतिसाद देणारा नेता विलासराव

**अजित सावंत**

कार्यकर्त्यांचा एस्एम्एस् असेल किंवा मोबाईलवर केलेला कॉल, लगेचच प्रतिसाद ही विलासरावांची खासियत होती त्याचेच हे उदाहरण ! माहीम पोलीस ठाण्यामधे एका अल्पसंख्याक समाजाच्या प्रौढ इसमाचा पोलीस ठाण्यामधे मृत्यू झाला. बहुसंख्याक समाजाच्या एका कुटुंबाबरोबर झालेल्या भांडणाची तक्रार पोलीस ठाण्यामधे नोंदविल्यानंतर पोलीसांनी या इसमाला ताब्यात घेतले होते. मध्यरात्री पोलीस ठाण्यामधे झालेल्या या अचानक मृत्युमुळे लोकांमधे संताप उसळला होता. आजाराची कोणतीही चिन्हे नसताना झालेल्या मृत्युमुळे अल्पसंख्य समाजामधे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. संतापलेले लोक भर मध्यरात्री रस्त्यावर उतरण्यास सुरुवात झाली होती. बघता बघता हजारोंचा जमाव रस्त्यावर उतरला. प्रक्षुब्ध जमावातील भडक माथ्याच्या तरुणांनी बदल्याची भाषा सुरु केली. माहीम पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांसोबत उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरेही फौजफाटयासह दाखल झाले. अत्यंत संयमी अधिकारी म्हणून आपला ठसा उमटवलेल्या फडतरे यांच्यासाठी ही कसोटीच होती. परिसरातील शांतताप्रेमी प्रतिष्ठित नागरीकांबरोबर व राजकीय कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधण्यांस त्यांनी सुरुवात केली. परंतु काहींचे उद्देश निराळेच होते. सरकारला व सत्ताधारी पक्षांना लक्ष्य करण्याचा काही राजकीय पक्षांचा उद्देश ही लपून राहिला नव्हता. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते या नात्याने मी स्वतः नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेविका मीना देसाई व अन्य सहकाऱ्यांसह, फडतरेंच्या प्रयत्नांना अनुकूल ठरेल असे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील होतो. मृत्यू पावलेल्या इसमाला ताब्यामधे घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करा ही जमावाची मागणी होती. जमावातील काही जण तर अन्य समाजाच्या तक्रारदार कुटुंबातील तरुणांवर हल्ला करण्याच्या योजना आखीत असल्याचीही चर्चा होती. रस्त्यावर उतरलेले लोक जणू बेभान झाले होते. वातावरणातील तणाव क्षणोक्षणी वाढतच होता. मुंबईतील अल्पसंख्याक समाजाच्या सुरक्षेचा ठेका आपणच घेतल्याचा आव आणणाऱ्या व चिथावणीखोर व भडक भाषणांसाठी प्रसिध्द असलेल्या नेत्याला जमावातीलच कुणीतरी बोलावून घेतले. आल्या-आल्याच महाशयांनी अल्पसंख्याकांवर सत्ताधारी पक्षांकडून कसा अन्याय केला जात आहे याचे पाढे वाचायला सुरुवात केली. बहुसंख्य समाजाच्या तक्रारदार कुटुंबावरच गुन्हा नोंदवायला हवा अशी भलतीच मागणी पुढे रेटण्यासही त्यांनी सुरुवात केली. जमाव अधिकच उग्र होऊ लागला. १९९३ च्या दंगली व बॉम्बस्फोटानंतर माहीम हा संवेदनशील विभाग म्हणून पाहीला जात होता. काही विपरित घडले तर संपूर्ण मुंबईमधे त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता होती. या प्रसंगी कोण धावून येणार ? रात्रीचे जवळ जवळ दोन वाजले होते. धीर एकवटून मुख्यमंत्री विलासरावांना त्यांच्या मोबाईलवर फोन केला. ४-५ रिंग नंतर विलासरावांनी स्वतः फोन उचलला. सुरवातीलाच अवेळी फोन केल्याबद्दल त्यांची माफी मागितली. बोला अजित, विलासरावांच्या सुरामधे, वैताग वा राग नव्हता तर तो स्वर आश्वासक होता. थोडक्यामधे विलासरावांना परिस्थितीची

कल्पना दिली. विलासरावांनी माहीती दिल्याबद्दल आभार मानले तसेच आपण स्वत: लक्ष घालू असे सांगून संपर्कात रहाण्याची सूचना दिली. एव्हढया रात्री महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आपला फोन घेतो, ऐकून घेतो व योग्य ते करण्याचे आश्वासन देतो हे सारं माझ्यासाठी मोठया आश्चर्याचं होतं.

थोडयाच वेळामधे मुख्यमंत्र्यांच्या योग्य व अचूक सूचना प्राप्त झालेले अतिरिक्त आयुक्त दर्जाचे (आज मुंबईमधे उच्च पदावर असलेले) अधिकारी माहीम पोलीस ठाण्यामधे पोहोचले. अत्यंत कणखरपणे त्यांनी चिथावणीखोर पुढाऱ्याला योग्य भाषेत समज ही दिली. पोलीसांची कुमकही येऊन पोहोचली होती. या प्रकरणी आपण योग्य शहानिशा करु परंतु मुंबईला दंगलीचे गालबोट लावू देणार नाही हा त्या अधिकाऱ्याचा पवित्रा पाहून ‘त्या‘ नेत्यानेही काढता पाय घेतला. नेत्यापाठोपाठ जमावही पांगला व होऊ घातलेली दंगल ही टळली. हे जमू शकले ते विलासरावांच्या, कार्यकर्त्यांना प्रतिसाद देण्याच्या या खासियतीमुळेच !

**(अजित सावंत)**

**मो.: 98200 69046**

**E-mail: ajitsawant11@yahoo.com**